# भाग – ३

# मृत्यूनंतरचे जीवन

# मृत्यूनंतरचे जीवन

## मृत्यूची संकल्पना

मृत्यू (death) या शब्दाचा अर्थ जर आपण शब्दकोशात पाहाल तर त्यात मृत्यूची व्याख्या लिहिलेली असेल – the permanent end of life (जीवनाचा नेहमीकरिता अंत).

मृत्यूची ही शब्दकोशातील व्याख्या मृत्यूचे नकारार्थी चित्र दर्शविते. याचा अर्थ असा होतो की माणसाने परिपूर्ण व्यक्ती म्हणून जन्म घ्यावा आणि काही काळ जिवंत राहिल्यानंतर नेहमीसाठी त्याचा अंत व्हावा. त्याच्या सर्व इच्छाआकांक्षा, त्याच्या सर्व योग्यता यांचा या पद्धतीने अंत व्हावा की त्यानंतर पुन्हा अस्तित्वात येणे शक्य राहणार नाही.

याउलट इस्लाम जीवनाचे सकारात्मक चित्र प्रस्तुत करतो. इस्लामच्या अनुसार मृत्यू जीवनाचा अंत नाही, मृत्यू केवळ मानवी जीवनाच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ आहे. (Death is not the end of life. Death marks the beginning of the second phase of human life.)

इस्लामच्या अनुसार माणसाला शाश्वत निर्मिती म्हणून निर्मिलेले आहे. त्यानंतर त्याच्या जीवनकालास दोन भागांत विभागले गेले –

१. मृत्युपूर्व भाग, आणि २. मृत्यूनंतरचा भाग.

मृत्युपूर्व भाग हा तयारी करण्याचा काळ आहे आणि मृत्यूनंतरचा भाग केलेल्या तयारीनुसार शाश्वत प्रतिफळ मिळविण्याचा काळ.

मानव निर्मितीचा हा उद्देश लक्षात घेतल्यास माणसाने मृत्युपूर्व जीवन पूर्णपणे

तयारी करण्यात वापरायला पाहिजे. कारण मृत्यूनंतरच्या जीवनकालात कृती करण्याची संधी असणार नाही, तेव्हा फक्त केलेल्या कृत्यांचं प्रतिफळ मिळवायचं असेल.

मृत्यूची घटना खरं म्हणजे जीवनाचा संदेश आहे. मृत्यूचा संदेश आहे की जे करायचं आहे ते आजच करून घ्या, कारण उद्या करण्याची संधी शिल्लक असणार नाही.

## पहिले जीवन, दुसरे जीवन

माणूस जेव्हा जन्म घेऊन या जगात येतो तेव्हा हे त्याचे पहिले जीवन असते. येथे त्याला न मागताच सर्व गोष्टी उपलब्ध असतात. जन्मल्याबरोबर त्याला प्रेमळ नातेवाईक मिळतात. पूर्णपणे अनुकूल असलेलं वातावरण त्याला मिळतं. अशी पृथ्वी मिळते जिच्यावर परिपूर्ण जीवनाधार यंत्रणा (लाइफ सपोर्ट सिस्टम) आहे ज्याशिवाय येथे जीवन शक्य नव्हते. या सर्व गोष्टी त्याला एकतर्फी स्वरूपात मिळतात, मग या गोष्टींची त्याला जाणीव असो वा नसो.

अशा तऱ्हेने एक मर्यादित काळ जीवन जगल्यानंतर माणूस मरतो. मृत्यूची ही घटना त्याच्यासाठी एका नवीन प्रवासाची घटना असते. मृत्यूनंतर तो एका दुसऱ्या जगात पोहोचतो. येथे सुद्धा आधीप्रमाणेच तो जिवंत आणि भावनाप्रधान माणूस असतो. फक्त येथे आता तो एकटा झालेला असतो. मागील जीवनात त्याला मिळालेल्या सर्व गोष्टी आता त्याच्यापासून नेहमीसाठी सुटलेल्या असतात. आता त्याला पुन्हा याची गरज असते की त्या सर्व गोष्टी त्याला पूर्ववत मिळाव्यात ज्यामुळे तो सुखासमाधानाचे जीवन जगू शकेल.

## मृत्यूनंतर

मृत्यू प्रत्येक व्यक्तीसाठी एक नको असलेली गोष्ट आहे. माणूस दीर्घ काळ जगू इच्छितो. पण अचानकपणे एक दिवस तो मृत्यू पावतो. असं वाटतं की जणू माणूस प्रवासात होता, त्याला खूप दूर जायचं होतं. पण तो मुक्कामाच्या स्थळी पोहोचण्याआधीच मृत्यूने एकतर्फी निर्णय घेऊन त्याच्या प्रवासाचा अंत करून टाकला.

माणसाला दीर्घ काळ जगायचं असतं पण अर्ध्यातच त्याच्या मनाविरुद्ध त्याला मृत्यूचा निर्णय स्वीकारावा लागतो. असं का घडतं हा प्रत्येक व्यक्तीचा प्रश्न आहे. जीवन काय आहे आणि मृत्यू काय आहे यांचं प्रत्येकाला उत्तर हवं आहे.

जेव्हा या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आपण प्रयत्न करतो, आपल्याला पहिली गोष्ट डीएनएच्या आधुनिक संशोधनात सापडते. प्रत्येक माणसामध्ये त्याचा डीएनए असतो. प्रत्येक माणसाचा डीएनए जणू त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण ज्ञानकोश आहे. या डीएनएला डीकोड केलं गेलं म्हणजे त्याचा अर्थ लावला गेला तर तो सर्वात मोठ्या ज्ञानकोशापेक्षाही शेकडो पटीने जास्त मोठा असेल. प्रत्येकाच्या डीएनएमध्ये त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व लहानमोठ्या पैलूंचा समावेश असतो.

सर्वच माहिती सांगणाऱ्या या डीएनएची एक विचित्र गोष्ट आहे. ती म्हणजे यात मानवी व्यक्तिमत्त्वाच्या केवळ एका पैलूची नोंद नाही. एखाद्याच्या डीएनएचा अभ्यास करून त्याच्याबद्दलची प्रत्येक गोष्ट माहीत केली जाऊ शकते. पण केवळ एक गोष्ट माहीत करणे शक्य नाही की तो कधी मरणार आहे. डीएनएमध्ये प्रत्येक गोष्टीचा उल्लेख असणं आणि केवळ मृत्यूचा उल्लेख नसणं जणू निसर्गाकडून केलेली ही घोषणा आहे की माणूस कधीच न मरणारी निर्मिती आहे. त्याच्यासाठी सदैव जीवन आहे. त्याला वास्तवात कधी मृत्यू येणार नाही.

आता मानवी व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू आपण पाहू. सर्व सजीवांत केवळ माणूसच असा आहे जो उद्याची (म्हणजे भविष्याची) संकल्पना बाळगतो. इतर सर्व सजीव केवळ आजमध्ये जगतात, उद्या त्यांना माहीत नाही. त्यांच्याकडे असलेल्या मर्यादित बुद्धीमुळे त्यांची ही अवस्था आहे की ते आजमध्ये जन्मले आणि आजमध्येच त्यांचा अंत झाला. केवळ माणूस हा एक अपवाद आहे जो उद्याची संकल्पना बाळगतो.

मरणोत्तर जीवनाच्या संकल्पनेबाबत योग्य दृष्टिकोनावर पोहोचण्यासाठी आणखी एक पैलू विचारात घेणे आवश्यक आहे. या जगात प्रत्येक व्यक्ती असंख्य इच्छाआकांक्षा घेऊन जन्मते. आणि अशा तऱ्हेने मृत्यू पावते की तिच्या इच्छाआकांक्षा पूर्ण झाल्याच नाहीत. अर्थात प्रत्येक व्यक्ती अपूर्ण इच्छाआकांक्षांचं

एक उदाहरण आहे. निसर्गाचा सर्वसामान्य नियम पाहाल तर ही घटना पूर्णपणे विसंगत दिसेल. या सबंध सृष्टीत केवळ माणसालाच ही अडचण आहे. माणसाशिवाय दुसऱ्या कोणत्याच प्राण्याला ही अडचण नाही.

ही वस्तुस्थिती हे दर्शविते की या अडचणीचं काही ना काही समाधान असायला पाहिजे. माणसाच्या इच्छाआकांक्षाना सुद्धा त्याचप्रमाणे पूर्ती मिळायला पाहिजे ज्याप्रमाणे इतर प्राण्यांना मिळालेली आहे. ही वस्तुस्थिती या गोष्टीचा संकेत आहे की सध्याच्या जगानंतर आणखी एक जग आहे जेथे माणसाला त्याच्या इच्छाआकांक्षांची पूर्ती मिळणार आहे.

याचप्रमाणे या घटनेचा आणखी एक पैलू अधिक महत्त्वाचा आहे. माणसामध्ये नैसर्गिक स्वरूपात न्यायाचा विचार आढळतो. नैसर्गिक स्वरूपात त्याची ही इच्छा असते की या जगात न्यायासह निवाडा व्हावा. चांगल्या लोकांना त्यांच्या चांगुलपणाचा पूर्ण मोबदला मिळावा आणि वाईट लोकांना त्यांच्या वाईटपणाची शिक्षा मिळावी. ही मानवी स्वभावाची हाक आहे. ही हाक सुद्धा हेच सुचवते की एक असं जग यायला पाहिजे जेथे प्रत्येकाला न्याय मिळेल. कारण या जगात तर न्याय मिळणं शक्य नाही.

वर उल्लेखीत गोष्टींना समोर ठेवून विचार केल्यास मृत्यूनंतरच्या जीवनाची संकल्पना अगदी वास्तविक असल्याचे लक्षात येते. ही संकल्पना मान्य केल्यावरच माणसाला त्याच्या प्रत्येक प्रश्नाचं परिपूर्ण उत्तर मिळतं. Everything falls into place या विधानाप्रमाणे प्रत्येक गोष्ट आपल्या ठिकाणी बरोबर होऊन जाते.

## वेळ संपली आहे.

शाळेमध्ये परीक्षा सुरू होती. सर्व विद्यार्थी आपापले प्रश्न सोडवत होते. जेव्हा परीक्षेची निर्धारित वेळ पूर्ण झाली, परीक्षागृहातील अधिकाऱ्याने घोषणा केली की 'लिहिणं बंद करा, वेळ संपली आहे'.

परीक्षागृहाचे हे उदाहरण विस्तृत प्रमाणात जीवनाचे सुद्धा आहे. हे जग एक मोठे परीक्षागृह आहे आणि येथे प्रत्येक जण आपापली परीक्षा देत आहे. प्रत्येकाला

ठरावीक वेळ दिलेला आहे. वेळ पूर्ण होताच ईश्वराचा दूत येतो आणि शांत सुरात ही घोषणा करतो की तुमची कृती करण्याची वेळ संपली आहे. आता तुम्हाला मरायचं आहे आणि मृत्यूनंतर आपल्या निर्मात्यासमोर उत्तर देण्यासाठी उपस्थित व्हायचं आहे. शालेय परीक्षेच्या उदाहरणावरून जीवनाच्या परीक्षेला समजले जाऊ शकते. परीक्षागृहात जी अवस्था विद्यार्थ्यांची आहे तीच प्रत्येक स्त्रीपुरुषाची या जगात आहे. जीवन याच परीक्षेच्या अवस्थेचं नाव आहे आणि मृत्यू नाव आहे पुढील विश्वातील प्रवेशाचं. हे ते विश्व आहे जेथे प्रत्येकाला त्याच्या कृत्यांचं फळ मिळेल.

परीक्षागृहात विद्यार्थी ज्या मानसिकतेने राहतात त्याच मानसिकतेने आपण पूर्ण जीवनात राहण्याची गरज आहे. ईश्वराकडून मिळालेल्या प्रश्नपत्रिकेला अचूक प्रकारे सोडवण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. ज्यामुळे परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर जेव्हा निकाल समोर येईल तेव्हा ती यशाची शुभवार्ता असेल, अपयशाची घोषणा असणार नाही.

## विचार करा, विचार करा, विचार करा.

माणूस जेव्हा जन्म घेऊन या पृथ्वीवर येतो तेव्हा त्याला आढळतं की येथे एक परिपूर्ण लाइफ सपोर्ट सिस्टम आहे म्हणजे पृथ्वीवर अशी एक यंत्रणा आहे जिच्यामुळे पृथ्वीवर जीवन शक्य आहे. ही यंत्रणा इतकी परिपूर्ण आहे की ती माणसाच्या प्रत्येक लहानमोठ्या आवश्यकतेला कसलाच मोबदला न घेता अत्यंत उत्कृष्टरीत्या पूर्ण करत आहे. पृथ्वीपासून ते सूर्यापर्यंत संपूर्ण सृष्टी माणसाच्या सेवेत लागलेली आहे.

यानंतर असा एक दिवस येतो जेव्हा माणूस अचानकपणे मरतो. स्वभावतः माणूस शाश्वत जीवन जगू इच्छितो. पण शंभर वर्षाच्या आतच ही घटना घडते की तो आपल्या इच्छेविरुद्ध या जगाला नेहमीसाठी सोडून निघून जातो.

पृथ्वीवर जन्म घेणारी प्रत्येक व्यक्ती दोन गोष्टींचा अनुभव करते. आधी जीवनाचा आणि त्यानंतर मृत्यूचा. जर माणसाने या गोष्टींचा गांभीर्याने विचार केला तर निश्चितच एक मोठी वास्तविकता त्याला ज्ञात होईल. त्याला कळेल

की माणसाला जन्म देऊन या पृथ्वीवर वसवणं बक्षीस म्हणून नाही तर परीक्षा म्हणून आहे. सध्याच्या जगात माणूस अनुभवतो की येथे त्याला स्वातंत्र्य आहे. पण त्याला मिळालेलं हे स्वातंत्र्य फक्त हे पाहण्यासाठी आहे की तो आपल्या स्वातंत्र्याचा सदुपयोग करतो का दुरुपयोग, तो नियमबद्ध जीवन व्यतीत करतो का नियमबाह्य जीवनाचा मार्ग अंगीकारतो.

माणसाने जर गांभीर्याने विचार केला तर त्याला या वास्तवाची जाणीव होईल की मृत्यू खरं म्हणजे ईश्वरासमोर उपस्थितीचा दिवस आहे. वस्तुतः माणूस एक शाश्वत निर्मिती आहे. पण त्याच्या जीवनकालाची विभागणी दोन भागांत केलेली आहे – मृत्युपूर्व जीवनकाल आणि मृत्यूनंतरचा जीवनकाल. मृत्युपूर्व जीवनकाल परीक्षेसाठी आहे आणि मृत्यूनंतरचा जीवनकाल मागील नोंदींनुसार बक्षीस किंवा शिक्षा प्राप्त करण्यासाठी.

माणूस आज या जगात जिवंत आणि सुजाण स्वरूपात आहे. हे त्याचं स्वरूप चिरकालीन आहे. मृत्यू तो दिवस आहे जेव्हा या जिवंत आणि सुजाण अस्तित्वाचं अगदी तशाच स्वरूपात या तात्पुरत्या जगातून पुढील चिरकालीन जगात स्थलांतर केलं जातं.

हा क्षण प्रत्येक स्त्रीपुरुषावर येणं अटळ आहे. कल्पना करता येणार नाही इतका गंभीर क्षण तो असेल. मृत्यूनंतरच्या जीवनकालात हाच सध्याचा माणूस असेल पण त्याच्या सर्व साधनसंपत्तीस नेहमीसाठी तो मुकलेला असेल. त्याच्यामागे असं जग असेल जे त्याच्यापासून नेहमीसाठी विभक्त झालं आणि त्याच्यासमोर असं जग असेल जेथे त्याला कसल्याच साधनसामग्रीशिवाय सदैव राहायचं असेल. शहाणा माणूस तो आहे जो या येणाऱ्या दिवसासाठी स्वतःला तयार करेल.

## इहलोकाची उभारणी, परलोकाची तयारी

लोकांकडे तुम्ही पाहाल तर आजकाल प्रत्येक जण तुम्हाला व्यस्त आढळेल. त्यांची ही व्यस्तता इतकी जास्त आहे की त्यांच्याकडे दुसरं काही ऐकण्यासाठी वेळ नाही. त्यांना त्यांच्या वेळेचा आणि पैशांचा केवळ एकच वापर कळतो आणि तो म्हणजे केवळ आपल्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांचा वापर करणे.

लोकांची ही व्यस्तता कोणत्या ध्येयासाठी आहे? ते ध्येय फक्त हे आहे की आपल्या इहलोकाच्या जीवनाला अधिकाधिक चांगले बनवणे, आपल्या इहलोकाच्या भविष्याची उभारणी करणे. पण मृत्यू जीवनाच्या या दृष्टिकोनाशी प्रतिकूल आहे. प्रत्येक व्यक्तीचा शेवटी अंत यावरच होत आहे की लवकरच तो मृत्यू पावतो. आपण उभारलेल्या विश्वाला तो पूर्णपणे सोडून देतो. आणि अशा विश्वाकडे एकटा निघून जातो ज्यासाठी त्याच्याकडे काहीही नसतं.

प्रत्येक स्त्रीपुरुषाची अवस्था अशी आहे की ते आपली पूर्ण शक्ती खर्च करून आपल्या अपेक्षांचं आणि आपल्या इच्छाआकांक्षांचं एक जग बनवतात. ते आपल्या या जगात जगतच असतात की अचानक मृत्यूची वेळ येते. असहायपणे स्वतः उभारलेल्या विश्वाला सोडून एका दुसऱ्या जगात त्यांना पोहोचावं लागतं, अशा जगात ज्यासाठी त्यांनी कसलीच तयारी केलेली नव्हती. त्यांनी उभारलेलं विश्व नेहमीसाठी त्यांच्यामागे सुटलेलं असतं आणि आता त्यांच्यापुढे असं एक अफाट वाळवंट असतं ज्यासाठी त्यांनी काही तयारी केलेली नाही. सर्व गोष्टींनी समृद्ध असल्याच्या भावनेत जगणारा अचानकपणे सर्व गोष्टींनी वंचित झालेल्या जगात प्रवेश करतो.

मृत्युपूर्व जीवनकाल प्रत्येक माणसाकरिता पहिली आणि शेवटची संधी आहे. यानंतर कोणालाही दुसरी संधी मिळणार नाही. ज्या माणसाने ही संधी केवळ ऐहिक सामग्री प्राप्त करण्यात घालवली त्याच्याकडे मरणोत्तर जीवनकालात पूर्णपणे वंचित जीवन जगण्याशिवाय दुसरा पर्याय असणार नाही. कारण मृत्यू त्याच्या मागील इतिहासाला त्याच्यापासून विभक्त करून टाकेल आणि मृत्यूनंतर पुन्हा एकदा नवीन इतिहास रचण्याची संधी नेहमीसाठी त्याच्याकडून हिरावून घेतली गेली असेल. किती विचित्र आहे आजची ती संधी जी माणूस गमावत आहे आणि किती भयानक असेल उद्याची ती वंचितता जिच्याशी माणसाचा सामना होईल आणि स्वतःला वाचवणे त्याला शक्य असणार नाही!

प्रत्येक स्त्रीपुरुषाची ही अवस्था आहे की जन्मल्यानंतर जेव्हा ते या जगात येतात तेव्हा ते सुद्धा त्याच ऐहिक परिभाषेत विचार करायला लागतात ज्याप्रमाणे त्यांच्या सभोवतालचे लोक विचार करत आहेत. ते सुद्धा त्याच ऐहिक कार्यांत

व्यस्त होऊन जातात ज्यामध्ये त्यांच्याआधीचे लोक व्यस्त होत राहिलेले आहेत. याच वस्तुस्थितीचा हा परिणाम आहे की ऐहिक विचारसरणीस ऐतिहासिक सातत्याचं स्वरूप आलेलं आहे. ही विचारसरणी सांस्कृतिक परंपरेत अशा प्रकारे समाविष्ट झालेली आहे की तिच्यापासून वेगळे होऊन विचार करणे कोणत्या स्त्रीपुरुषासाठी शक्य असल्याचे दिसत नाही.

हेच ते ठिकाण आहे जेथे माणसाची खरी परीक्षा आहे. माणसाला चिरकालीन यश मिळविण्यासाठी या ऐतिहासिक शृंखलेबाहेर येऊन विचार करावा लागेल, पारंपरिक संस्कृतीने विभक्त होऊन वास्तविकतेच्या आधारावर आपलं मत बनवावं लागेल. जे लोक असं करतील त्यांना ताबडतोब हे कळून जाईल की खरी गोष्ट इहलोकाची उभारणी करण्याची नाही तर खरी गोष्ट परलोकाची तयारी करण्याची आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषाचं मुख्य काम हेच आहे की त्यांनी मृत्यूपूर्वीच्या जीवनकालामध्ये मृत्यूनंतरच्या जीवनकालाची तयारी करावी, स्वतःला या लायक बनवावे की मृत्यूनंतर येणाऱ्या शाश्वत जीवनकालामध्ये ते यशस्वी व्यक्ती सिद्ध होऊ शकतील.

## श्वासाचा व्यवसाय

दिल्लीत आमच्या वसाहतीत एक गृहस्थ होते. लोक त्यांना मुल्लाजी म्हणायचे. त्यांच्याकडे म्हशी होत्या आणि त्यांचा दुधाचा व्यवसाय होता. त्यांची मैत्री एका हिंदू व्यापाऱ्याशी होती. त्यांचा लोखंडाचा व्यवसाय होता. एकदा मुल्लाजींची एक म्हैस मेली. आपल्या हिंदू मित्राशी भेट झाल्यावर त्यांनी याचा उल्लेख केला. हे ऐकून लोखंडाचा व्यवसाय असलेल्या त्या हिंदू व्यापाऱ्याने त्यांना सांगितले की 'मुल्लाजी, आपला तर श्वासाचा व्यवसाय आहे. श्वास आला तर आला, नाही तर नाही आला.' म्हणजे एक म्हैस केवळ त्या वेळेपर्यंत जिवंत आहे जोपर्यंत तिचा श्वास सुरू आहे. श्वास जर थांबला तर तिचे जीवन सुद्धा संपून जाईल.

उपरोक्त व्यापाऱ्याने ही गोष्ट मुल्लाजींच्या व्यवसायासंबंधी सांगितली होती. पण वास्तविकता ही आहे की प्रत्येक जिवंत व्यक्तीची बाब सुद्धा अशीच आहे. खरं म्हणजे त्या व्यापाऱ्याने म्हणायला पाहिजे होतं की 'मुल्लाजी, माझी आणि तुमची गोष्ट तर श्वासाची आहे. श्वास आला तर आला, नाही तर नाही आला.'

माणसाच्या शरीरात जीवनाकरिता आवश्यक अशा निरनिराळ्या प्रकारच्या व्यवस्था आहेत. यातीलच एक आहे – श्वसन व्यवस्था. मानवी जीवनासाठी ही व्यवस्था अगदी अनिवार्य आहे. श्वसन व्यवस्था जोपर्यंत काम करत आहे तोपर्यंतच माणूस जिवंत आहे. जेव्हा ही व्यवस्था बंद पडते तेव्हा काही मिनिटांतच माणसाचा मृत्यू होतो.

माणसाने प्रत्येक क्षणी आपल्या मृत्यूला आठवावे. जो माणूस इतका जास्त बेसावध असेल की दुसऱ्याचा मृत्यू पाहून सुद्धा त्याला स्वतःचा मृत्यू आठवत नाही तो जणू भावनाहीन दगड आहे. तो दिसायला माणूस असेल पण एखाद्या दगडाप्रमाणे त्याच्यामध्ये सुद्धा मानवी भावनांचा अभाव आहे. मृत्यूची आठवण करणे भावनाप्रधान व्यक्तीचा स्वभावगुण आहे आणि मृत्यूला न आठवणे भावनाहीन व्यक्तीचा स्वभावगुण.

वास्तविक पाहता दुसऱ्याचा मृत्यू स्वतः आपल्या मृत्यूची आठवण आहे. प्रत्येक मृत्यू जिवंत लोकांना हे दर्शवितो की ज्याप्रमाणे मरणाऱ्याचा मृत्यू झाला त्याचप्रमाणे जिवंत असलेल्यांचा सुद्धा मृत्यू होईल. प्रत्येक मृत्यू ही आठवण करून देतो की 'लोकहो, भविष्याची तयारी करा. कारण सरतेशेवटी जी गोष्ट तुमच्या वाट्याला येणारी आहे ती तुमचं भविष्य आहे, तुमचा भूतकाळ नाही.'

## दुःखदायक अंत

'प्रत्येक व्यक्ती आपली सर्व शक्ती खर्च करून जास्तीत जास्त पैसा कमावते, केवळ यासाठी की नरकाचं सगळ्यात महागडं तिकीट तिला विकत घेता येईल' – अनेकदा अतिदुःखाने हे वाक्य माझ्या तोंडातून निघतं.

आजकालच्या लोकांना मी पाहतो की ते त्यांच्या संपूर्ण वेळ आणि संपूर्ण शक्तीसह पैसे कमावण्यात लागलेले आहेत. रात्रंदिवस केवळ एकाच गोष्टीत ते मग्न आहेत की कशा पद्धतीने जास्तीत जास्त पैसा ते कमावू शकतील. हीच ती गोष्ट आहे जिला कुराणाच्या अध्याय क्र. १०२ मध्ये तकासुर म्हटले गेले आहे. म्हणजे कमाई करत करत कबरीत पोहोचणे आणि मग नरकाचा सामना करणे. आजकाल ही अवस्था आहे की धर्मनिरपेक्ष लोक आणि तथाकथित धार्मिक

लोक दोघांनीही एकाच गोष्टीला आपले ध्येय बनवलेले आहे. आणि ते म्हणजे प्रत्येक शक्य मार्गाने जास्तीत जास्त पैसा कमवायचा.

शिवाय या पैशांचा वापर सुद्धा फक्त एकच आहे आणि तो म्हणजे भौतिक सुखसोयींत वाढ करणे. घर, गाडी, कपडे यासारख्या गोष्टींत जास्तीत जास्त वाढ करणे. जर एखादी व्यक्ती धार्मिक दिसत असेल तर ती फक्त औपचारिक स्वरूपात धार्मिक आहे. जीवनाचा उद्देश पाहिला तर जवळपास प्रत्येकाचं ध्येय केवळ भौतिक प्रगती हेच आहे.

पण प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा अंत एका दुःखदायक परिणामावर होत आहे, आपली सर्व भौतिक प्रगती येथेच सोडून या जगातून त्यांना निघावं लागत आहे. ही अत्यंत गंभीर वस्तुस्थिती आहे. जगातील जवळपास सर्वच लोकांची हीच अवस्था आहे. आपल्या कल्पनेनुसार ते विकासाकडे जात आहेत पण मृत्यू प्रत्येकाला सांगत आहे की तुमचा प्रवास केवळ विनाशाच्या खड्ड्याकडे होता, विकासाच्या स्थळी नव्हता.

किती विचित्र आहे मानवाचा हा अंत की तो आपला सर्वोत्तम काळ आणि आपली सर्वोत्तम शक्ती खर्च करून कुराणाच्या 'लतरवुन्नल जहीम'चं उदाहरण बनत आहे (पाठ १०२, वाक्य ६). म्हणजे स्वर्गाचे स्वप्न पाहणारा शेवटी स्वतःला नरकाच्या खड्ड्यात पडलेला असल्याचे पाहणार आहे.

## मृत्यू – एक आठवण

मृत्यू मरणाऱ्यासाठी मृत्यू आहे आणि जिवंत राहणाऱ्यासाठी स्वतःच्या मृत्यूची आठवण. जेव्हा एखादा माणूस मरतो तर असं दिसतं की बोलणारा शांत झाला. पण त्याचं शांत होणं खरं म्हणजे एक घोषणा असते. ही घोषणा की – जी वेळ येणार होती ती माझ्यावर आली, आता हीच वेळ तुमच्यावर सुद्धा येणार आहे. या येणाऱ्या वेळेसाठी तुम्ही तयार व्हा.

आजकाल ही प्रथा आहे की जेव्हा एखाद्याच्या वयाचा एक वर्ष पूर्ण होतो आणि त्याच्या वयाचा पुढील वर्ष सुरू होतो तेव्हा त्याचा वाढदिवस साजरा करतात. पण जास्त योग्य गोष्ट ही राहिली असती की त्या दिवसाला मृत्यूची

आठवण करून देणारा दिवस असे समजले गेले असते. वास्तविक पाहता प्रत्येकाच्या वयाची सातत्याने उलटगणती सुरू आहे. प्रत्येक वाढदिवस फक्त हे दर्शवतो की तुमच्या जीवनकालाचा आणखी एक वर्ष कमी झाला. मृत्यू हीच उलटगणती पूर्ण होण्याचा दिवस आहे.

लोक आपला जन्मदिवस हॅपी बर्थडे म्हणून साजरा करतात पण वस्तुस्थिती पाहिली तर गोष्ट याउलट आहे. प्रत्येक नवीन वाढदिवस खरं म्हणजे या गोष्टीची आठवण आहे की मृत्यूचा दिवस किंवा ईश्वराकडे हिशेब देण्याचा दिवस अधिक जवळ येऊन पोहोचला आहे, मृत्यूनंतरच्या जीवनाची तयारी करण्याचे आणखी एक वर्ष कमी झाले आहे.

## या जीवनाच्या पलीकडे

वरवर पाहता माणूस एक परिपूर्ण अस्तित्व आहे. पण वास्तविक पाहता तो केवळ एक अपूर्ण अस्तित्व आहे. माणसाकडे डोळे आहेत पण तो बाह्य प्रकाशाशिवाय पाहू शकत नाही. माणसाकडे कान आहेत पण तो बाह्य हवेशिवाय ऐकू शकत नाही. माणसाकडे पाय आहेत पण जमिनीत योग्य प्रमाणात गुरुत्वाकर्षण असल्याशिवाय तो चालू शकत नाही. माणसाकडे तोंड आहे पण बाह्य जगात अन्नपदार्थ असल्याशिवाय तो आपली भूक भागवू शकत नाही.

आता अशा एका काळाची कल्पना करा, जेव्हा तुम्ही पूर्णपणे याच अस्तित्वासह जिवंत आहात पण तेथे तुम्हाला लागणाऱ्या सर्व बाह्य गोष्टी हिरावून घेतल्या गेल्या आहेत. तुमच्याकडे डोळे आहेत पण पाहण्यासाठी तेथे प्रकाश नाही. तुमच्याकडे तोंड आहे पण सर्व अन्नपदार्थ तेथून नाहीसे झाले आहेत. तुमच्याकडे पाय आहेत पण त्या पायांखाली उचित गुरुत्वाकर्षण असलेली जमीन नाही. याहीपेक्षा अधिक म्हणजे तेथे तुम्ही एकटे झालेले आहात. तुमचे सर्व स्वकीय तुमची साथ सोडून निघून गेलेले आहेत.

ही काही काल्पनिक गोष्ट नाही. याच वस्तुस्थितीशी प्रत्येक स्त्रीपुरुषाचा मृत्यूनंतर सामना आहे. आणि मृत्यू प्रत्येक स्त्रीपुरुषावर येणं अटळ आहे. कोणतीही व्यक्ती जी आज जिवंत आहे ती नक्कीच एक दिवस मरेल आणि मग मृत्यूनंतर ती स्वतःला ज्या जगात पाहील ते तेच जग असेल ज्याचं वर्णन वरील उताऱ्यात केलं गेलं.

हा येणारा दिवस प्रत्येकाकडे धावून येत आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषाचं पहिलं काम हे आहे की त्यांनी या येणाऱ्या दिवसाला ओळखावे आणि त्यासाठी तयारी करावी. तो दिवस जेव्हा येईल तेव्हा तो अशा पद्धतीने येईल की आता बदलण्याची कोणालाही संधी असणार नाही. यानंतर माणसाला फक्त भोगायचं असेल, मागे जाऊन पुन्हा एकदा तयारीची आता संधी नाही.

## ध्येयहीन धावपळ

प्रत्येक जण अथक बोलत आहे. प्रत्येकाने आपल्या गरजा अगदी टोकापर्यंत वाढवलेल्या आहेत. प्रत्येक जण आपल्या इच्छाआकांक्षाना अमर्यादित प्रमाणात पूर्ण करू इच्छितो. प्रत्येक जण ऐशआरामाच्या सर्व गोष्टी आपल्यासाठी आणि आपल्या मुलांसाठी गोळा करून घेऊ इच्छितो. ही ऐहिकतेच्या दिशेने वेडपट धावपळ आहे. शिवाय या धावपळीचा परिणाम फक्त हाच होत आहे की प्रत्येक जण या भावनेने जगतो की त्याच्या इच्छाआकांक्षांची पूर्ती झाली नाही. जे सुखसमाधान त्याला पाहिजे होतं ते तो प्राप्त करू शकला नाही. प्रत्येक स्त्रीपुरुष याच वंचिततेच्या भावनेने जगतात. याच अवस्थेत त्यांचे रात्र व दिवस जातात. येथपर्यंत की त्यांच्या इच्छाआकांक्षांचे घर काळाच्या वादळाशी धडकून अस्ताव्यस्त होऊन जाते. आणि जर काळाने असं केलं नाही तर मृत्यू मात्र नक्कीच असं करतो. कोणत्याही परिस्थितीत तो आपल्या निर्धारित वेळेवर येतो आणि आपला निर्दयी निर्णय स्वीकारण्यास प्रत्येकाला मजबूर करून टाकतो. याआधी सुद्धा सर्वांनी मृत्यूचा निर्णय असहायपणे स्वीकारलेलाच आहे.

लोक क्षणिक असलेल्या मृत्युपूर्व जीवनाच्या गोष्टी नीट करण्यात व्यस्त आहेत जेव्हाकी खरी गरज मृत्यूनंतरच्या चिरकालीन जीवनासाठी स्वतःला तयार करण्याची आहे. मृत्युपूर्व जीवन परीक्षेचे जीवन आहे. म्हणून ही ईश्वराची जबाबदारी आहे की त्याने प्रत्येकासाठी त्या गोष्टी पुरवाव्यात ज्या आधारे तो आपली परीक्षा देऊ शकेल. पण मृत्यूनंतरच्या जीवनाची बाब अशी नाही. त्याची जबाबदारी ईश्वराने घेतलेली नाही. मृत्यूनंतरच्या जीवनातील सर्व काही माणसाच्या स्वतःच्या कृत्यांवर अवलंबून आहे.

सध्याच्या जीवनाचं हे तत्त्व आहे की येथे माणसाने काहीही केलं नाही तरी

त्याला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी एकतर्फी स्वरूपात ईश्वराकडून उपलब्ध करून दिल्या जातात. पण पुढील जीवनाची गोष्ट याउलट आहे. पुढील जीवनाचं तत्त्व आहे – पेराल ते उगवेल. ही किती विचित्र गोष्ट आहे की लोक सध्याच्या जीवनासाठी तर खूप धावपळ करत आहेत पण पुढील जीवनाची बाब ते पूर्णपणे विसरलेले आहेत. सध्याच्या जीवनात आजच्या राहिलेल्या गोष्टी माणूस उद्या जास्त कृती करून पूर्ण करू शकतो पण पुढील जीवनाचं असं नाही. भूतकाळात राहिलेल्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी तेव्हा कोणाला पुन्हा एकदा संधी मिळणार नाही.

## भयानक परिणाम

सध्याच्या जगात प्रत्येकाकडे एक परिपूर्ण शरीर आहे, त्याचे बरेच मित्र व नातेवाईक आहेत. येथे जीवनाचे वेगवेगळे मार्ग त्याच्यासाठी उपलब्ध आहेत, कामाच्या निरनिराळ्या संधी त्याला मिळालेल्या आहेत. जीवनावश्यक सर्व सामग्री त्याने स्वतःभोवती गोळा करून ठेवलेली आहे. वैश्विक पातळीवर जीवनाधार यंत्रणा त्याला साहाय्य करत आहे, ... वगैरे.

या सर्व गोष्टी प्रत्येक स्त्रीपुरुषाला प्राप्त आहेत. त्यांना याचं भान असेल किंवा नसेल पण ते स्वतःला या गोष्टींचा मालक समजतात. त्यांना वाटतं जे काही आज त्यांच्याकडे आहे ते त्यांच्याकडे नेहमीसाठी राहील. परंतु एका मर्यादित कालावधीनंतर प्रत्येक स्त्रीपुरुषाला मृत्यू येतो. प्रत्येकासोबत ही घटना घडते की ते आपलं सर्व काही सोडून एकटे होऊन जातात आणि याच एकटेपणाच्या अवस्थेत ते दुसऱ्या एका जगात पोहोचतात. येथे त्यांच्याकडे आता त्या कोणत्याही गोष्टी उपलब्ध नसतात ज्यांचे मृत्यूपूर्वी आपण मालक असल्याचे ते समजून होते. ही निःसंशय सर्वाधिक कटू वास्तविकता आहे जिचा अनुभव प्रत्येकाला येणार आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषास अशा एका दिवसाला सामोरे जायचे आहे जेव्हा त्यांच्याकडून त्यांचं सर्व काही हिरावून गेलेलं असेल आणि त्यांच्यापुढे एक असा अनंत काळ असेल ज्याला तोंड देण्यासाठी त्यांच्याकडे काहीही सोबत असणार नाही.

प्रत्येकाकडे एक गोष्ट असते – त्याची जीवनावश्यक साधनसामग्री, आणि याबरोबरच आणखी एक गोष्ट असते – त्याचं स्वतःचं व्यक्तिमत्त्व. प्रत्येक जण

मोठ्या परिश्रमाने आपलं एक अस्तित्व बनवतो, समाजामध्ये एक स्थान प्राप्त करतो. आपल्या मेहनतीने स्वतःचा एक विशिष्ट इतिहास घडवतो. हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा बाह्य भाग असतो. या गोष्टींनी समाजात त्याला एक विशेष दर्जा प्राप्त होतो. पण सगळी धडपड करून प्राप्त केलेली माणसाची ही अवस्था पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपाची आहे. मृत्यू अचानकपणे प्रत्येकाकडून त्याची ही अवस्था हिरावून घेतो. आणि मृत्यूनंतर प्रत्येक जण पुढील जगात या पद्धतीने प्रवेश करतो की त्याची साधनसामग्री सुद्धा त्याच्यापासून हिरावून घेतली जाते आणि त्याने घडवलेला इतिहास सुद्धा त्याच्यापासून वेगळा होऊन जातो. या भयानक परिणामापासून केवळ तो माणूस मुक्त आहे ज्याने मृत्यूआधीच मृत्यूनंतर येणाऱ्या काळाची पूर्वतयारी केलेली असते.

## मृत्यूनंतरचे जग

एक दिवस मी माझ्या खोलीत बसलेला असताना बाहेरून एका गाण्याचे बोल मला ऐकू आले. त्यातील एक ओळ अशी होती – कशा जातील त्या रात्री, कसे जातील ते दिवस (कैसे बितेंगी वह रातें, कैसे बितेंगे वह दिन).

हे ऐकून अचानक माझं मन मृत्यूनंतरच्या जीवनाकडे वळलं. मी विचार केला मृत्युपूर्व जीवनात माणसाकडे सर्व काही आहे. त्याला तहान लागते तर येथे पाणी उपलब्ध आहे. त्याला भूक लागते तर येथे वेगवेगळ्या प्रकारचे अन्नपदार्थ उपलब्ध आहेत. अशा तऱ्हेने त्याला लागणाऱ्या सर्व गोष्टी येथे पूर्णपणे उपलब्ध आहेत – जसे घर, फर्निचर, गाडी, टेलिफोन, बँक बॅलन्स,...

मग मी विचार केला हे सर्व काही मृत्युपूर्व जीवनात आहे. मृत्यूनंतरच्या जीवनात माणूस स्वतःला एका अशा विशाल वाळवंटात पाहील जेथे कोणतीही वस्तू त्याच्यासाठी उपलब्ध असणार नाही. अचानकपणे आपले सर्व काही हिरावून घेतले गेल्याचे त्याला आढळेल.

माणसाने जर खऱ्या अर्थाने त्या येणाऱ्या दिवसाची आठवण केली तर तो अस्वस्थ होऊन जाईल, त्याचे डोळे दुःखाश्रूंनी भरून जातील. तो म्हणेल – माझ्यासाठी ते दिवस किती अंधकारमय असतील आणि त्या रात्री किती गैरसोयीच्या असतील!

आज माणसाला सर्व काही मिळालेलं आहे, पण उद्या हे सर्व काही हिरावून गेलेलं असेल. हीच प्रत्येक व्यक्तीची सगळ्यात मोठी अडचण आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषाला खरं तर आजपेक्षा उद्याबद्दल जास्त विचार करायला पाहिजे, त्यांना आपल्या जीवनाचं भविष्यकेंद्रित नियोजन करायला पाहिजे. ज्यामुळे येणाऱ्या दिवशी ते त्या परिणामापासून स्वतःला वाचवू शकतील ज्याचा उल्लेख बायबलामध्ये या शब्दांत केलेला आहे – 'त्यांच्याकरिता नेहमीसाठी तेथे आक्रोश करणे आणि दात कडकडावणे असणार आहे' (मॅथ्यू १३:४२).

## मृत्यूची सूचना

एका माणसाचं वय ७५ वर्षांचं झालं. सुरुवातीच्या काळात त्याची प्रकृती चांगली होती. आता त्याला आजार लागले. हे आजार त्याच्यासाठी मृत्यूची सूचना होते. पण त्याला आजार म्हणजे केवळ उपचार करण्याची गोष्ट वाटली. त्याने वेगवेगळ्या डॉक्टरांकडे आणि इस्पितळांत स्वतःला रुजू केले. जेव्हा त्याचे स्वतःचे पैसे संपले त्याने कर्ज घेऊन महागडा उपचार सुरू केला. पण त्याला पुन्हा एकदा आरोग्य मिळू शकले नाही. काही वर्षे आजारी राहून तो मृत्यू पावला. ही एका माणसाची गोष्ट नाही. हीच जवळपास स्त्रीपुरुषांची गोष्ट आहे.

म्हातारपण प्रत्येक माणसासाठी या गोष्टीची सूचना असते की मृत्यू जवळ आला आहे. यानंतर जेव्हा त्याला आजार लागतात तर ते त्याला आणखीच हालवून सोडण्यासाठी असतात. ते यासाठी असतात की तो जर झोपत असेल तर त्याने जागे व्हावे आणि तो जर जागा असेल तर चालायला लागावे. म्हातारपण आणि त्यानंतर येणारे आजार व अशक्तता नेहमी यासाठी येतात की माणसाने खडबडून जागे व्हावे, मृत्यूच्या आधीच मृत्यूची तयारी करायला लागावे, मृत्यूनंतर येणाऱ्या गोष्टींवर विचार करावा आणि त्यानुसार आपल्या जीवनाचं शेवटचं नियोजन करावं.

पण माणूस घटनांपासून धडा घेत नाही. म्हातारपण आणि आजार त्याला मृत्यूची सूचना देतात. पण तो मृत्यूबद्दल विचार करण्याऐवजी केवळ उपचाराबद्दल विचार करतो. तो डॉक्टरांच्या आणि इस्पितळांच्या मागे धावतो. येथपर्यंत की तो निराश होऊन मृत्यू पावतो. दुसऱ्यांदा जी गोष्ट त्याला मिळते ते आरोग्य नसते तर

केवळ मृत्यू असतो.

ही एक अशी वास्तविकता आहे जी प्रत्येक व्यक्ती आपल्या सभोवतालच्या वातावरणात पाहते, पण कोणीही त्यापासून धडा घेत नाही. या बाबतीत प्रत्येक व्यक्ती आंधळी बनलेली आहे. ती केवळ या प्रतीक्षेत आहे की मृत्यूने तिचे डोळे उघडावे. पण मृत्यूनंतर डोळे उघडणं कोणत्या व्यक्तीसाठी काही फायद्याचं ठरणार नाही.

## स्वर्गास कोण पात्र होतील?

स्वर्ग म्हणजे सुख आणि आनंदाने भरलेलं अवर्णनीय जग आहे. असं स्वर्ग केवळ त्या लोकांनाच मिळेल जे त्यांच्या अवर्णनीय कार्याच्या आधारावर स्वतःला त्यासाठी पात्र सिद्ध करतील. स्वर्ग चिरकालीन ईश्वराच्या सान्निध्यात चिरकालीन स्थान मिळविण्याचं नाव आहे. (कुराण : पाठ ५४, ओवी ५५) असं असामान्य निवासस्थान केवळ त्याच सुदैवी लोकांना मिळू शकतं जे त्यासाठी सर्वोच्च किंमत मोजण्याचं धैर्य दाखवतील.

स्वर्गातील हे अतुलनीय स्थान मिळविण्यासाठी माणसाला अतुलनीय कृत्यांचाच पुरावा द्यावा लागेल. न दिसू शकणारी गोष्ट पाहू शकण्यास स्वतःला समर्थ बनवावे लागेल. वेळकाळामध्ये राहताना वेळकाळाबाहेर पाहू शकण्याची नजर स्वतःमध्ये निर्माण करावी लागेल. शब्दांच्या अंधकारमय जंगलात अर्थाचा प्रकाश प्राप्त करावा लागेल. इच्छाआकांक्षाच्या समुद्रात राहताना स्वतःला त्या समुद्रात बुडण्यापासून वाचवावे लागेल. अहंकाराचा पर्वत असताना सुद्धा अहंकारशून्य बनावे लागेल. अशुभचिंतकांच्या गर्दीत राहताना सुद्धा स्वतःला लोकांचा शुभचिंतक बनवावे लागेल. परिपूर्ण स्वातंत्र्यात राहताना सुद्धा बंधनाचं जीवन जगावं लागेल. न बोलल्या गेलेल्या शब्दांना ऐकावं लागेल, न दिसणाऱ्या वास्तविकतेचा स्वीकार करावा लागेल. असत्याने भरलेल्या जगात सत्य बोलण्याचा पुरावा द्यावा लागेल. अप्रामाणिकतेने भरलेल्या वातावरणात प्रामाणिकतेचे धोरण अवलंबावे लागेल.

ईश्वराचे दूत दिवसरात्र अशा लोकांची यादी बनवण्यात कार्यरत आहेत जे

मृत्यूनंतरच्या जीवनात ईश्वराच्या स्वर्गामध्ये प्रवेशास पात्र ठरतील. हे ते लोक आहेत जे ईश्वराला ओळखू शकले, त्यांच्या ईशजाणीवेमुळे इतर सर्व वस्तूंपासून त्यांनी आपले लक्ष बाजूला सारले आणि केवळ ईश्वरच त्यांच्या काळजीचा विषय बनला. त्यांच्या स्वर्गाच्या ओढीने त्यांच्यासाठी या जगातील प्रत्येक आकर्षक वस्तू आकर्षणहीन बनली. ईश्वराच्या महानतेच्या भावनेने त्यांच्यातील अहंकार आणि मोठेपणाच्या सर्व भावनांचा अंत झाला. ईशशिक्षेच्या संभावनेने आनंदात राहताना सुद्धा आनंद उपभोगणे त्यांच्यासाठी शक्य राहिले नाही. इतरांसाठी श्रवणीय असलेले आवाज त्यांच्यासाठी अश्रवणीय बनले. या जगातील प्राप्ती किंवा वंचितता दोन्ही त्यांना सारखेच निरर्थक दिसू लागले. स्वतःला अचूक सिद्ध करण्यापेक्षा माझं चूक होतं असं म्हणणं त्यांना अधिक प्रिय झालं.

स्वर्ग एक अस्सल ठिकाण आहे. ते अस्सल गुणांच्या किमतीवरच एखाद्याला प्राप्त होईल. स्वर्गात ते लोक वसवले जातील जे ईश्वरी गुणांचे धारक असतील. सध्याच्या जगात स्वतःमध्ये ईश्वरी गुण निर्माण करणारेच स्वर्गात वसवले जाण्यास पात्र ठरतील. एखाद्याला स्वर्ग मिळण्याचं कारण कोणतं रहस्यमय नाही, ते पूर्णपणे उघड आणि स्पष्ट आहे. आणि ते कारण हेच आहे की माणसाने या जीवनात स्वतःमध्ये ईश्वरी गुण निर्माण करावेत. स्वर्ग खऱ्या लोकांची वसाहत आहे. त्याच खऱ्या लोकांची निवडप्रक्रिया येथे सुरू आहे. जे लोक येथील जीवनात पूर्णपणे खरे व्यक्ती सिद्ध होतील तेच स्वर्गाच्या चिरकालीन जगात वसवले जाण्यास पात्र ठरतील.

## सर्वोत्तम स्नेह्याकडे

कुराणाच्या ६६ व्या पाठात सांगितलं गेलं आहे की इजिप्तच्या प्राचीन राजाने जेव्हा त्याच्या श्रद्धावंत पत्नीस मृत्युदंड सुनावला तेव्हा तिच्या तोंडातून हे शब्द बाहेर पडले – 'हे माझ्या ईश्वरा, माझ्यासाठी स्वर्गात तुझ्याजवळ एक घर बनव.' एका सर्वसामान्य श्रद्धावंताच्या शब्दांत केलेली ही प्रार्थना आहे. हीच प्रार्थना मुहम्मद पैगंबरांच्या तोंडून त्यांच्या अंतिम समयी एका प्रेषिताच्या शैलीत याप्रमाणे होती – हे ईश्वर, सर्वोत्तम स्नेही.

या दोन्ही प्रार्थना वास्तविक पाहता समानार्थीच आहेत. पहिली प्रार्थना एका

सर्वसामान्य श्रद्धावंताच्या शब्दांत आहे आणि दुसरी प्रार्थना उच्च पातळीवर एका प्रेषिताच्या शब्दांत.

खरं म्हणजे या दोन्ही प्रार्थना मृत्यूबाबतीत श्रद्धावंताच्या भावनेचं प्रकटीकरण आहेत. यातून इतर श्रद्धावंतांसाठी हा संदेश मिळतो की जेव्हा मृत्यूची वेळ येते तेव्हा त्यांची भावना वरील तऱ्हेच्या प्रार्थनेच्या स्वरूपात प्रकट झाली पाहिजे. त्या क्षणी त्यांची ही भावना असायला पाहिजे की जेव्हा माझं या जगाशी नातं संपेल तेव्हा महान ईश्वराचं सान्निध्य मला प्राप्त होवो. मला लोकांची सभा सोडावी लागली तर ईशदूतांच्या सभेत सामील होण्याचं भाग्य मला मिळो. जेव्हा मृत्यू मला माझ्या स्वकीयांपासून विभक्त करेल तेव्हा मी एकटा न होऊन जावो, तर ईश्वर माझ्यासोबत राहो. मृत्यूचा प्रवास माझ्यासाठी कनिष्ठ स्नेह्यांकडून ते सर्वोत्तम स्नेह्याकडे नेणारा ठरो.

वरील प्रार्थना एखाद्या श्रद्धावंताचे केवळ शब्द नाहीत. त्याच्या आतील भावनांचं ते शब्दांतलं प्रकटीकरण आहे. खऱ्या श्रद्धावंताची सदैव हीच तीव्र इच्छा असते की सध्याच्या जीवनापेक्षा मृत्यूनंतरचे जीवन त्याच्यासाठी अधिक चांगले सिद्ध होवो. सध्याच्या या परीक्षेच्या जगात त्याला ईश्वराची जी कृपा तात्पुरत्या स्वरूपात मिळाली आहे ती त्याला मृत्यूनंतरच्या जगात उत्कृष्ट पातळीवर आणि चिरकालीन स्वरूपात मिळावी. मृत्यू त्याच्यासाठी निकृष्ट जग सोडून परिपूर्ण जगात प्रवेश करण्याचे माध्यम ठरो.

# या पुस्तिकेच्या प्रकाशकाकडून
# एक आठवण

कालपर्यंत पृथ्वीवरच स्वर्गाची स्वप्ने दाखवणारे शास्त्रज्ञ आज एकमुखाने सांगत आहेत की पृथ्वीचा अंत जवळ आला आहे. सबंध ब्रम्हांडात केवळ एकच ग्रह होता – पृथ्वी जेथे जीवनास आधार देणारी व्यवस्था होती जी आता कोलमडण्याच्या मार्गावर आहे आणि काही काळात पृथ्वीवर जीवन शक्य असणार नाही. तसं ते यासाठी काही उपाय सुद्धा सुचवत आहेत जसे, झाडे लावणे, पेट्रोल, पाणी, वीज इत्यादींची बचत करणे, ... वगैरे. पण हे उपाय त्यांच्या उथळ ज्ञानाला उघड करण्यापलीकडे काहीही नाहीत. कारण पृथ्वीवर जीवन शक्य असण्यामध्ये कोणत्या शास्त्रज्ञाची काही भूमिका नाही. त्याचं नियोजन पूर्णपणे फक्त ईश्वराने केलेलं आहे. पृथ्वीपासून सूर्य–चंद्राचं विशिष्ट अंतर, पृथ्वीचा सूर्याभोवती फिरण्याचा वेग, निरनिराळे हवामान, माणसाला उपयोगी पडणारे असंख्य प्राणी, वनस्पती किंवा पृथ्वीच्या गर्भातील असंख्य धातू या सगळ्या गोष्टींचं नियोजन कोणत्या शास्त्रज्ञाने केलेलं नाही.

पृथ्वीचा अंत होण्याबाबतची आज विज्ञानाला कळलेली गोष्ट हजारो वर्षांपासून वेळोवेळी ईश्वराच्या प्रेषितांनी सांगितलेलीच आहे. ईश्वराकडून मिळालेल्या विशेष ज्ञानाआधारे त्यांनी ही गोष्ट सांगितली होती. पण या भीषण घटनेपासून स्वतःला वाचवण्यासाठी झाडे लावण्याचा त्यांनी सल्ला दिला नव्हता तर स्वतःला पुण्यवान बनवण्याचा सल्ला दिला होता. बाह्य जगात सुधार करण्याचा नाही तर अंतरात्म्याला शुद्ध करण्याचा सल्ला दिला होता. पण माणसाला स्वतःची चूक स्वीकारून योग्य मार्गावर येण्यापेक्षा झाडे लावून स्वतःचं समाधान करणं जास्त सोयीस्कर वाटतं. पण दुर्दैवाने आपल्याला सोयीस्कर वाटणाऱ्या कृतीच्या आधारावर ईश्वराच्या कृपेची किंवा त्याच्या स्वर्गाची अपेक्षा करता येत नाही. या गोष्टींची अपेक्षा ईश्वराने दाखवलेल्या मार्गावर जाऊनच करता येते.

ईश्वराने त्याच्या ग्रंथांतून आणि प्रेषितांच्या माध्यमातून हा संदेश दिला की त्याने ही पृथ्वी मानवजातीच्या कायम वास्तव्यासाठी नाही तर तात्पुरत्या

वास्तव्यासाठी बनवलेली आहे. या पृथ्वीवरील मानवी जीवन केवळ परीक्षेसाठी आहे. एक दिवस तो या पृथ्वीचा अंत करेल आणि पहिल्या माणसापासून ते शेवटच्या माणसापर्यंत सर्वांना पुन्हा जिवंत करून त्यांचा निवाडा करेल. या पृथ्वीवर त्यांनी व्यतित केलेल्या जीवनानुसार एक तर स्वर्ग नावाच्या परिपूर्ण जगात त्यांना कायमचं वास्तव्य मिळेल किंवा नरकाच्या दुर्दैवी नगरीमध्ये त्यांना फेकून दिले जाईल. पृथ्वी निर्माण करण्याचा ईश्वराचा हा उद्देश असल्यामुळे त्याने या पृथ्वीवर केवळ तीच साधने ठेवली ज्यांना वापरून माणूस परीक्षा देऊ शकतो. आपल्या कल्पनेच्या विश्वात जगणाऱ्यांनी मात्र ही साधने वापरून पृथ्वीवरच स्वर्गनिर्मितीचा प्रयत्न केला. त्यांना मृत्यूनंतरच्या जीवनात आपल्या सत्कृत्यांच्या मोबदल्यात स्वर्ग नको होता तर या पृथ्वीवरच आपल्या दुष्कृत्यांच्या जोडीला स्वर्ग पाहिजे होता. सुरुवातीला स्वर्गाची स्वप्ने त्यांनी दाखवली आणि आज जागतिक तापमानवाढ, हवामानातील विघातक बदल अशा शब्दांनी पृथ्वी विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहे अशी ते वार्ता देत आहेत.

खरं म्हणजे ही पृथ्वी तिच्या निर्मात्याने परीक्षेसाठी बनवली असावी ही गोष्ट आपलं डोकं वापरणाऱ्या लहान मुलाला सुद्धा कळेल इतकी किरकोळ आहे. कारण ज्या ईश्वराची प्रत्येक गोष्ट पहिल्या दिवसापासून परिपूर्ण आहे, काय तो पृथ्वीवरील मानवी जीवन सुद्धा परिपूर्ण बनवू शकला नसता? मानवी जीवन सोडल्यास ईश्वराच्या प्रत्येक गोष्टीत परिपूर्णता आढळते. आकाश पहिल्या दिवसापासून तसाच आहे, कधी ईश्वराला त्याचा आकार किंवा रंग बदलून सुधारित आकाश बनवण्याची गरज पडली नाही. असंख्य प्रकारची फुले, फळे, प्राणी किंवा काहीही सुरुवातीपासूनच परिपूर्ण आहेत, त्यांत कोणत्या बदलांची ईश्वराला कधी गरज पडली नाही. सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्या अंतरात सुधारणा करण्याची त्याला गरज पडली नाही. याउलट माणसाने बनवलेल्या प्रत्येक गोष्टीत दररोज सुधारणा करावी लागते. कालचं तंत्रज्ञान आज जुनं झालेलं असतं. खुद्द तुम्ही वेळोवेळी ऐकलेलं वाक्य 'विज्ञान दररोज प्रगती करत आहे' विज्ञानाची प्रगती नाही तर अपुरेपणा दाखवतं. कारण दररोज प्रगतीचा अर्थ होतो की ते दररोज अपूर्ण राहत आहे आणि आपल्या पूर्णतेचा शोध घेत आहे.

सगळीकडे परिपूर्णता आणि केवळ मानवी जीवनात अपूर्णता या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की ईश्वराने ही पृथ्वी माणसाच्या परीक्षेसाठी बनवली. या पृथ्वीवरील

परीक्षेत जे लोक उत्तीर्ण होतील त्यांना नंतर तो स्वर्ग नावाच्या परिपूर्ण जगात प्रवेश देणारच आहे. येथे त्यांच्यासाठी आरोग्यापासून ते सर्व साधनांपर्यंत प्रत्येक गोष्ट परिपूर्ण स्वरूपात असेल. शिवाय जोडीला ईश्वराची प्रसन्नता आणि त्याचं सान्निध्य नेहमीसाठी त्यांना मिळेल. याउलट स्वतःच्या कल्पनेचं जीवन जगून जे या पृथ्वीवरील परीक्षेत अनुत्तीर्ण होतील त्यांना नरकाच्या कचरापेटीत फेकून दिले जाईल, जेथे केवळ अपमानित आणि पश्चात्तापाचं जीवन ते जगतील. स्वार्थाच्या प्रत्येक गोष्टीत आपण आपली बुद्धी वापरली आणि ईश्वराच्या बाबतीत आपण केवळ आंधळेपणा दाखवला आणि स्वर्गास पात्र होण्याची संधी गमावून टाकली या मनस्तापाने ते तेथे कायमचे तडफडत राहतील.

शेवटची आठवण हीच आहे की जीवन एक संधी आहे. या संधीचा वापर ईश्वराचं सान्निध्य मिळविण्यासाठी करा, त्याच्या स्वर्गातील प्रवेशास पात्र होण्यासाठी करा. जी पृथ्वी परीक्षा देण्यासाठी आहे तेथे स्वर्गनिर्मितीसाठी धडपडून काही उपयोग नाही. इतिहास साक्षी आहे, असे असंख्य धडपडणारे काही कालावधीनंतर हे जग सोडून निघून गेले आणि दररोज जात सुद्धा आहेत. त्यांच्या आंधळ्या धडपडीने त्यांना येथे स्वर्ग तर मिळाले नाही पण ईश्वराकडे स्वर्ग मिळवण्याची संधी सुद्धा त्यांनी गमवून टाकली. जगाचे मालक असल्याच्या तोऱ्यात जगणाऱ्या हिटलर, गद्दाफी सारख्या असंख्यांचा असहाय अंत झाला आणि इतरांचा सुद्धा होईल. या वास्तविकतांवर विचार करा. शब्दांचा युक्तिवाद करून काहीही उपयोग नाही. उद्या जेव्हा बोलण्याची शक्ती हिरावून घेतली जाईल तेव्हा कोणती शब्दसंपत्ती कोणाच्या मदतीला येणार नाही. ईश्वराच्या महानतेला आणि आपल्या असहायतेला ओळखून स्वतःला त्याच्या अधीन करण्यातच शहाणपणा आहे. ईश्वराला अपेक्षित असलेल्या जीवनाबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी त्याचा ग्रंथ आणि त्याच्या प्रेषिताचं जीवन सदैव तयार आहे. यांचा अभ्यास करा आणि आपल्याकडे असलेली प्रत्येक योग्यता, प्रत्येक संधी, प्रत्येक ज्ञान सर्व काही ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी वापरा आणि त्याच्या परिपूर्ण स्वर्गाचे कायमचे रहिवासी व्हा. म्हणजे जेव्हा मृत्यूचा क्षण येईल तेव्हा ती दुःखद वार्ता असणार नाही तर ईश्वराच्या भेटीची आणि स्वर्गातील प्रवेशाची सुखद वार्ता असेल.

ईश्वर आम्हा सर्वांना योग्य मार्ग प्राप्त करण्याची आणि त्यावर चालण्याची बुद्धी व शक्ती देवो. हीच शेवटी त्याला विनम्र प्रार्थना.